शनिवार,दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक जपुती २२१६ /मुसका-३/प्र.क्र.२७/२९
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख: - २७ जानेवारी,२०१६

# परिपत्रक

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर २ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शनिवार दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/ कर्मचारी/ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, ठिक ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा ११.०३ मिनीटांपर्यंत वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१२७११३५४९०४०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravikant Ganpat Panchal

Digitally signed by Ravikant Ganpat Panchal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4d632f688a5def40e348dd4096560792e62ee8b6c44eb75bc50ebc2af6045a7c, cn=Ravikant Ganpat Panchal
Date: 2016.01.27 11:36:15 +05'30'

र.ग.पांचाळ
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्रमांक: रातुमनावि / सा.प्र. / २३४५ दिनांक: २९ जानेवारी २०१६

प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित:—

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख,
२. विद्यापीठ संचालित व सलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक

महोदय / महोदया,

आपणास विनंती करण्यात येते की, वरील परिपत्रकानुसार आपण आपल्या स्तरावर कार्यवाही घ्यावी.

आपला,

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव